॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

A Grade
NAAC Re-Accredited ( 3rd Cycle)

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## विद्यार्थी विकास विभाग

☎ 0257-2257418, 419 **FAX** - 0257-2258403, 406 **Email-** sw@nmu.ac.in **Website-** nmu.ac.in

जा.क्र. उमवि/14/विवि/मैका-23/ 10 /2018 दि.3/1/2018

प्रति,

**मा.प्राचार्य / मा. संचालक / विभाग प्रमुख,**
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय / मान्यता प्राप्त परिसंस्था व**
**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना -**

**विषय:- विद्यापीठस्तरीय मैत्री कार्यशाळा सहभागाबाबत.....**
**संदर्भ:-** विद्यापीठाचे पत्र क्र.उमवि/14/विवि-46/201/2017, दि.7/8/2017

महोदय / महोदया,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत पदवी-पदव्युत्तर नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा याकरीता सातत्याने विविध स्पर्धा, कार्यशाळा, चर्चासत्रे, युवक महोत्सव, प्रदर्शन व मार्गदर्शने आयोजित केली जातात. याअनुषंगाने विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होऊन त्यास सभोवतालचे वातावरण अवगत व्हावे, श्रमसंस्कृतीची जाण व्हावी, सांस्कृतिक कला जोपासली जावी, एकमेकांमध्ये मैत्री भावना निर्माण व्हावी व त्यांन्या उपक्रमाद्वारे अधिक माहिती होण्याचा प्रयत्न विभागाद्वारे केला जात आहे.

विद्यार्थ्यांमध्ये मैत्री भावनेनुसार सर्वांगिण विकास होण्यासाठी **विद्यापीठस्तरीय मैत्री कार्यशाळेचे** आयोजन **दि.11 ते 13 जानेवारी, 2018** या कालावधीत **श्री. व्ही. एस. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रावेर, जि.जळगाव** येथे आयोजित करण्यात येत आहे.

सदर कार्यशाळेत आपल्या महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा विभाग मधील खालील निकषानुसार **6 विद्यार्थी (3 विद्यार्थी व 3 विद्यार्थिनी)** निवड करून पाठवावेत, ही विनंती.

* कार्यशाळेत सहभागी होणारा विद्यार्थी गुणवत्ताधारक, आज्ञाधारक, कुशल, बोलका निर्णय घेणारा, कला जोपासणारा व नेतृत्व गुण सांभाळणारा असावा.
* सदर विद्यार्थी या शैक्षणिक वर्षात (सन 2017-18) नियमित शिक्षण घेणारा असावा. त्याच्या/तिच्याकडे अद्यावत (प्राचार्य/संचालक यांच्या सही व शिक्का असलेले) ओळखपत्र असावे.
* सदर विद्यार्थी-विद्यार्थिनीने यापूर्वी विद्यापीठ/ राज्य /राष्ट्रीय स्तरावरील मैत्री कार्यशाळेत सहभाग घेतलेला नसावा.

कृपया निकषानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवास, चहा अल्पोहार व भोजन व्यवस्था आयोजकांमार्फत नि:शुल्क केली जाईल. मात्र त्यांचा येण्याजाण्याचा प्रवासखर्च विद्यार्थी प्रवास सवलत दराने महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास निधीतून करावा.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना :-**
* मैत्री कार्यशाळा उद्घाटन सोहळा दि. 11 जानेवारी, 2018 रोजी सकाळी 9.30 वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सकाळी 9.00 वाजेपर्यंत कार्यशाळा स्थळी उपस्थित राहाणे अगत्याचे आहे.
* कार्यशाळा कालावधी 3 दिवसांचा असल्याने विद्यार्थ्यांनी गरजेनुसार आवश्यक साहित्य, पाणी बॉटल, पांघरुण, गरम कपडे, बॅटरी, कापडी बुट-मोजे तसेच गरजेनुसार आवश्यक औषधी सोबत आणावी. कृपया विद्यार्थ्यांनी मौल्यवान वस्तू / मोबाईल वा गरजेपेक्षा अधिक रक्कम सोबत आणू नये.

* कार्यशाळेला केवळ 3 विद्यार्थी व 3 विद्यार्थिनी यांचीच निवड करुन त्यांना पाठवावे. निर्धारीत संख्येपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही. कार्यशाळेत 3 विद्यार्थी व 3 विद्यार्थिनी येणे आवश्यक आहे. जर विद्यार्थिनी ऐवजी 6 विद्यार्थी पाठविलेत तर त्यांचा प्रवेश नाकारला जाईल (फक्त मुलींचे महाविद्यालय / परिसंस्था वगळून) याची कृपया नोंद घ्यावी.

* निवड करण्यात आलेला विद्यार्थी हा/ही महाविद्यालयातील नियमित प्रवेशित असावा/ असावी व त्याच्या/ तिच्या कडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असावे. तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेतलेल्या विद्यार्थ्यांना कृपया स्पर्धेसाठी पाठवू नये.

* सांस्कृतीक कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी कला सादरीकरणासाठी पांरपारिक वेशभूषा, वाद्ये व आवश्यक साहित्य सोबत आणावे.

* कार्यशाळा कालावधीत मित्र, मैत्रिण, अथवा स्थानिक नातेवाईक यांना भेटीसाठी बोलविता येणार नाही. तसेच गैरवर्तन आढळल्यास विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून तात्काळ परत पाठविण्यात येईल.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक माहिती व संपर्कासाठी -**

1. मा. प्राचार्य कार्यालय - दूरध्वनी क्र. (02584) 250447, ई-मेल principalvsn_rvr@yahoo.in
2. प्रा. संदिप दासराव धापसे, विद्यार्थी विकास अधिकारी, भ्रमणध्वनी क्र.9158950385
3. प्रा. सत्यशिल बन्सी धनले, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी, भ्रमणध्वनी क्र.9921339294

उपरोक्त अनुषंगाने आपणांस पुन:श्च कळवितो की, मैत्री कार्यशाळेत निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठामार्फत पुरविलेल्या नमुन्यातील अर्ज, पालकांचे संमतीपत्रक व आपले शिफारसपत्र **दि.9/1/2018** पर्यंत **श्री. व्ही. एस. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रावेर, जि. जळगाव** यांना ई.पत्ता principalvsn_rvr@yahoo.in पाठवून सहकार्य करावे व विद्यार्थ्यांना परिपत्रकातील सूचनेप्रमाणे उपस्थित राहाण्याच्या सूचना द्याव्यात. सदर परिपत्रक व विद्यार्थी स्वंयवृत्त विद्यापीठ **www.nmu.ac.in** या संकेत स्थळावर भेट दिल्यास उपलब्ध आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा. एस. टी. इंगळे)

**प्र. संचालक, विद्यार्थी विकास**

* **सोबत :-** विद्यार्थी स्वयंवृत्त

* **प्रत माहितीसाठी :-**

1) मा. प्राचार्य, श्री. व्ही. एस. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रावेर, जि. जळगाव
2) प्रा. नितीन आर. बडगुजर, डीएनसीव्हीपीएसचे लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव
3) मा. वित्त व लेखा अधिकारी, उ.म.वि., जळगाव.
4) स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरु कार्यालय, उ.म.वि., जळगाव.
5) मा. विभाग प्रमुख, उत्तमविद्या अंक, जनसंवाद पत्रकारिता विभाग, उ.म.वि., जळगाव.
6) मा.जनसंपर्क अधिकारी, उ.म.वि., जळगाव.
7) मा. पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, उ.म.वि., जळगाव.

पासपोर्ट
साईज रंगीत
फोटो

# विद्यार्थी स्वयंवृत्त
## विद्यापीठस्तरीय मैत्री कार्यशाळा

1) विद्यार्थ्याचे नाव (आडनाव प्रथम) :- -------------------------------------------------------
2) वर्ग :--------------
3) जन्म तारीख :- / /
4) शारीरिक दृष्ट्या सक्षम :- होय / नाही
5) रक्त गट :- ------
6) पत्र व्यवहार पत्ता (निवास) :- ---------------------------------------------------------
7) दूरध्वनी क्र. :- ( )
8) भ्रमणध्वनी क्र. :-
09) महाविद्यालय/परिसंस्था/प्रशाळा यांचे नाव :- ----------------------------------------------
10) दूरध्वनी क्र. :- ( )
11) ओळखपत्र क्र. :------------------
12) विद्यार्थी कल्याण उपक्रम सहभाग :- -------------------------------------------------------
-------------------------------------------------------
-------------------------------------------------------
13) स्वयंपूर्तीने आयोजित कार्यक्रम :- -------------------------------------------------------
-------------------------------------------------------
-------------------------------------------------------

( )

**विद्यार्थ्याची सही व नाव**

---

**-: पालकाचे संमती पत्र :-**

संमती पत्र लिहून देतो/देते की, श्री/सौ./ ----------------------------------------- माझा पाल्य मुलगा/मुलगी नामे --------------------------------------- हा/हि सदर कार्यशाळेत स्वयंप्रेरणेने व माझ्या सहमतीने सहभागी होत आहे. त्याला/तिला प्रवास व कार्यशाळा सहभाग कालावधीमध्ये शारीरिक दुखापत, मोठी हानी झाल्यास महाविद्यालय/विद्यापीठ यांना जबाबदार धरणार नाही. त्यांच्याकडे कोणताही नुकसान भरपाई व मानहाणी दावा करणार नाही.

**पालक/वडील/आई यांचे नाव व स्वाक्षरी**

---

**-: महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा यांचे शिफारस पत्र :-**

विद्यार्थी नाव ------------------------------ हा/हि नियमित शिक्षण घेत असुन नमूद माहिती नोंदी प्रमाणे बरोबर आहे. विद्यापीठस्तरीय मैत्री कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी शिफारस करीत आहे.

दिनांक :- / /2018

**विद्यार्थी विकास अधिकारी**
नाव व सही

**प्राचार्य/संचालक**
सही व शिक्का